# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## ➢ मिरा भाईंदर मनपा हद्दीत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण ,प्रभाग निहाय आरोग्यवर्धनी केंद्र / आपला दवाखानांची सुरूवात"

१५ वा वित्त आयोग अंतर्गत शहरी आणि ग्रामीण भागातील प्रामुख्याने प्राथमिक आरोग्य संस्थाना सक्षम करण्यासाठीचे विविध उपक्रम २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षाच्या कालावधीत राबविले जाणार आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार मिरा भाईंदर महानगरपालिके करिता सन २०२१-२२ करिता ११ व २०२२-२३ करिता २४ असे एकूण ३५ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र मंजूर करण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाने पहिल्या टप्प्यात मंजुर 11 केंद्रांपैकी 8 आरोग्यवर्धिनी केंद्राचे काम पुर्ण करण्यात आले असून 2 केंद्राचे काम अंतिम टप्प्यात आहे.

शासनामार्फत 8 वैद्यकीय अधिकारी व 6 परिचारिका उपलब्ध करून देण्यात आले होते, परंतु सदरपैकी 8 वैद्यकीय अधिकारी 2 ते 4 महिन्याच्या कालावधीत सोडून गेल्याने वैद्यकीय अधिकारी ही पदे रिक्त होती. वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता शासनमार्फत प्रतिमहा रु.60,000/- इतके मानधन मंजूर आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी काम सोडून गेल्याने ही पदे रिक्त राहत आहेत व आरोग्यवर्धिनी केंद्र कार्यान्वीत ठेवण्यास अडचणी निर्माण होत आहे त्यामुळे मा. आयुक्त महोदय यांनी सदर मानधनात प्रति महा रु.20,000/- इतकी वाढ करून रु. 80,000/- इतके करण्यास प्रशासकीय ठरावान्वये मान्यता दिली आहे.

त्यान्वये दि. 30/10/2023 रोजीच्या मंजुरीन्वये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व MPW या पदाकरीता जाहिरात प्रसिध्द करून अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यान्वये वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता 11 अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी 7 वैद्यकीय अधिकारी यांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. सदरपैकी 5 वैद्यकीय अधिकारी हजर झाले आहेत. सबब, खालील नमूद 5 आरोग्यवर्धिनी केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. सुरु करण्यात आलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, MPW, हाऊसकिपिंग स्टाफ व सिक्युरिटी गार्ड असे अधिकारी/कर्मचारी मंजूर असून दु.2.00 ते रात्री 10.00 या वेळेत रुग्णांची बाह्यरुग्ण तपासणी, औषध उपचार, प्रयोगशाळा तपासणी, टेली कन्सलटेंशन, गर्भवती मातांची तपासणी, लसीकरण इ. अशा सेवा मोफत देण्यात येतील.

| अ.क्र. | सुरू करण्यात आलेले नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र |
|---|---|
| 1 | पाली उत्तन - मनपा शाळा. |
| 2 | मोर्वागाव - मनपा शाळा. |
| 3 | इंद्रलोक - आरक्षण क्र. 225 रामदेव वुड्स, भाईंदर (पू.). |
| 4 | शांती नगर - मिरा रोड (पू.) |
| 5 | काजूपाडा - मनपा शाळा. |

तसेच MBBS ही शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवार उपलब्ध होत नसल्याने BAMS शैक्षणिक अर्हता असलेल्या उमेदवारांना पदावर नेमणूक देणेस शासनास विनंती करण्यात आली होती. त्यास शासनामार्फत परवानगी देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने वैद्यकीय अधिकारी ही पदे लवकरात लवकर भरण्याची कार्यवाही करुन उर्वरित आरोग्यवर्धिनी केंद्रे सुरु करण्यात येतील.